दैनिक
# महावृत्त

ई - मेल dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते.मो.९४२१०९४९९१,७२६४०७९९९०




लातूर वर्ष ३ रे अंक १०५ वा गुरूवार दि.०७ सप्टेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# तीन-चार दिवस राज्यात मान्सून सक्रिय

पुणे : प्रतिनिधी-आगामी तीन-चार दिवस राज्यात मान्सून सक्रिय होऊन काही विभागात जोरदार पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याचे रूपांतर आणि त्यामुळे निर्माण झालेली चक्रीय स्थिती यामुळे पावसाच्या सरी बरसतील असे हवामान खात्याने स्पष्ट केले



आहे.

दरम्यानपावसाअभावी राज्याच्या विविध भागात उकाड्याचे प्रमाण वाढले असून शेतीवर देखील परिणाम होतो आहे त्याचप्रमाणे काही भागात पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असून पाण्यासाठी टँकरची गरज भासू लागली आहे. गुरुवारपासून विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि मध्य महाराष्ट्र भागात दमदार पाऊस होणे शक्य आहे असे हवामान खात्याने स्पष्ट केले आहे.

कृष्णा आणि भीमा खो-यातील धरणात त्याचप्रमाणे खडकवासला धरण साखळीत पावसाचे प्रमाण चांगले असल्याने तूर्तास पाणी प्रश्न उद्भवणार नाही. खडकवासला प्रकल्प साखळीमध्ये २९ टीएमसी पाणीसाठा झाला आहे. तर कृष्णा आणि भीमा खो-यातील काही धरणे १०० टक्के भरली आहेत.

पावसाळ्यातील हंगामाचा हा अखेरचा महिना असून ऑगस्टमध्ये अपेक्षित प्रमाणात पाऊस झाला नाही त्यामुळे चिंता वाढली आहे. साधारणपणे १ सप्टेंबरपासून परतीच्या पावसाला सुरुवात होते मात्र यंदा तशी स्थिती अजून दिसत नाही.

परिणामी पावसाचा परतीचा प्रवास उशिरा सुरू होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. देशामध्ये ऑगस्टपर्यंत सरासरीपेक्षा ३६ टक्के आणि ५ सप्टेंबरपर्यंत सरासरीपेक्षा ११ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे. एल निनोचा परिणाम यंदा पावसाळ्याच्या हंगामावर दिसून आला आहे.

## भारत जोडो पदयात्रेच्या वर्षापूर्तीनिमित्त ७ सप्टेंबर रोजी माजी मंत्री आ अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर शहरात पदयात्रेचे आयोजन

लातूर ( प्रतिनिधी): संपूर्ण देशात एकात्मतेची भावना वृद्धिंगत व्हावी, नागरिकांची लोकशाही व्यवस्थेवरील निष्ठा कायम राहावी म्हणून काँग्रेस पक्षाचे नेते खा. राहुल गांधी यांनी काढलेल्या भारत जोडो यात्रेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून माजी मंत्री आमदार अमित विल-ासराव देशमुख यांच्या उपस्थितीत लातूर शहर जिल्हा काँग्रेस आणि जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने गुरुवार दिनांक ७ सप्टेंबर रोजी लातूर शहरात पदयात्रा काढण्यात येणार आहे. देशातील नागरिकांमध्ये स्नेहभाव निर्माण व्हावा त्यांच्यात लोकशाही व्यवस्थेबद्दल विश्वासाची भावना निर्माण व्हावी म्हणून मागच्या वर्षी काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी कन्याकुमारी ते काश्मीर पर्यंत भारत जोडो यात्रा काढली होती. या पदयात्रेला देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, समाजात द्वेष पसरवणाऱ्या शक्तीला यातून चपराक मिळाली, एकात्मतेची भावना वाढीस लागली, लोकशाही व्यवस्थेबद्दल जागृती निर्माण होऊन या व्यवस्थेवरील लोकांचा विश्वास दृढ झालाआहे. अनेक अंगाने यशस्वी ठरलेल्या या भारत जोडो यात्रेचा ७ सप्टेंबर रोजी वर्धापन दिना असून, या दिनाचे औचित्य साधून लातूर शहर जिल्हा काँग्रेस आणि लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने ७ सप्टेंबर २०२३ रोजी लातूर शहरात पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार अमित



देशमुख यांच्या उपस्थितीत लातूर शहरातील राष्ट्रपिता महात्मा गांधीचौकातून या पदयात्रेचा प्रारंभ होईल. शहरातील मुख्य रस्त्याने पदयात्रा मार्गक्रमण करीत ही यात्रा राजश्री छत्रपती शाहू महाराज चौक येथे पोहोचेल व त्या ठिकाणी समारोपाचा कार्यक्रम होईल, असे पक्षाच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे, या पदयात्रेत लातूर शहर व जिल्ह्या-तील काँग्रेस पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते, जिल्हा परिषद पंचायत समिती, नगरपरिषदा, महानगरपालिका तसेच इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थां, सहकारी संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी तसेच नागरिकांनी यांनी या पदयात्रेत सहभागी व्हावे असे अवाहन जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री श्रीशैल्य उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव यांनी केले आहे.

## शेतकर्यांच्या हिताला प्राधान्य देत सहप्रकल्प सुरू करणार-आ.संभाजी पाटील निलंगेकर

निलंगा/प्रतिनिधी:- मतदारसंघासह जिल्ह्यातील शेतकर्यांना आर्थिक स्थैर्य देऊन त्यांचे जीवनमान उंचाविण्याकरीता कर्मयोगी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना पुन्हा एकदा चालू करण्याचा निर्णय घेतला. ओंकार शुगरच्या माध्यमातून कारखाना गतवर्षी अत्यंत कमी वेळेत सुरु झा-लेला आहे.यावर्षी कारखाना वेळेत सुरु होऊन पाच लाखापेक्षा अधिकचे ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले आहे. शेतकर्यांच्या हिताला प्राधान्य देत नोव्हेंबर पर्यंत सहप्रकल्प सुरू करणार असल्याचा विश्वास माजी मंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिला.



निलंगा तालुक्यातील अंबुलगा येथील कर्मयोगी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना लिज ओंकार शुगर्सच्या दुसर्या गळीत हंगामानिमित्त माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या हस्ते रोलर पुजन करण्यात आले. यावेळी माजी मंत्री आ. निलंगेकर बोलत होते. याप्रसंगी कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील, निलंगा विधानसभा प्रमुख दगडु साळूंके, माजी जि.प. अध्यक्ष मिलिंद लातूरे, ज्येष्ठ विधिज्ञ सी.जे. सबनीस, निलंगा बाजार समिती सभापती शिवकुमार चिंचनसुरे, औराद बाजार समितीचे सभापती नरसिंग बिराजदार, जि.प.चे माजी सभापती संजय दोरवे, संतोष वाघमारे, शिरुर अनंतपाळ तालुका अध्यक्ष मंगेश पाटील, देवणी तालुका अध्यक्ष काशिनाथ गरिबे, उपसभापती लाल-ासाहेब देशमुख, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्ह्यातील साखर कारखानदारीमध्ये असलेली आपली मक्तेदारी मोडीत निघेल या भीतीने अनेकांनी कर्मयोगी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर साखर कारखाना सुरु होऊ नये याकरीता अडथळे आणण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगून या सर्व अडचणीवर मात करत केवळ शेतकर्यांच्या हितासाठी हा कारखाना ओंकार शुगरच्या माध्यमातून सुरु करण्यात आल्याचे माजी मंत्री आ. निलंगेकरांनी सांगितले. कारखाना चालवत असताना यामध्ये कोणतेही राजकारण आणले जाणार नाही असे आपण सातत्याने सांगितले असून या कारखान्याच्या माध्यमातून केवळ आणि केवळ शेतकर्यांचेच हित जोपसले जाणार असल्याचे पुन्हा एकदा त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळेच हा कारखाना शेतकर्यांच्या विकासाचे मंदीर ठरावे या दृष्टीने कारखान्यात अनेक सहप्रकल्प सुरु करण्यात येत आहेत. या प्रकल्पाचे काम अंतिम टप्यात आले असून या प्रकल्पातून डिस्टलरी, सीएनजी, इथेनॉल व खतनिर्मिती करण्यात येणार असल्याचे सांगितले. हे प्रकल्प नोव्हेंबर महिन्यात सुरु होतील असा विश्वास देऊन या प्रकल्पाचा शुभारंभ केंद्रीय मंत्र्याच्या उपस्थितीत होईल अशी घोषणाही माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी यावेळी केली.

कारखान्यात सुरु होणार्या सहप्रकल्पामुळे शेतकर्यांच्या ऊसाला अधिकाधिक भाव मिळण्यास मोठी मदत होईल असे सांगून यावर्षी पाच लाख मे.टनापेक्षा अधिकचा ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट चेअरमन बोत्रे पाटील यांनी ठेवले असल्याचे माजीमंत्री आ. निलंगेकर यांनी सांगितले. विशेष म्हणजे गतवर्षी २५६२ रूपयांचा भाव घोषीत करून शेतकर्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला होता. मात्र यावर्षी अधिकाधिक दर आपला कारखाना देईल अशी ग्वाही देऊन कारखाना अधिक यशस्वीपणे चालविण्यासाठी शेतकर्यांनी कारखाना प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी यावेळी केले.

याप्रसंगी चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी माजी खा. रुपाताई पाटील निलंगेकर व माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गतवर्षी कारखाना अत्यंत कमी वेळात चालू केला असल्याचे सांगून याकरीता कारखान्यातील अधिकारी व कर्मचार्यांनी मोठी मदत केली असल्याचेही सांगितले. कारखाना हा केवळ शेतकर्यांच्या हितासाठीच चालवावा अशी सुचना सातत्याने माजी खा. रूपाताई पाटील निलंगेकर यांच्या वतीने होत असते त्याचबरोबर माजी मंत्री आ. निलंगेकरही कारखाना चालवित असताना कोणताही राजकीय स्पर्श होऊ देत नाहीत याबद्दल त्यांचे आभारही व्यक्त केले. यावर्षी कारखाना जिल्ह्यात अधिकाधिक दर देईल असा विश्वास देऊन ऊस उत्पादक शेतकर्यांनी वेळेत आपल्या ऊसाचे गाळप होण्यासाठी ऊसाची नोंदणी करावी असे आ-वाहन करून कारखाना कार्यक्षेत्रातील संपूर्ण ऊसाचे गाळप केल्याशिवाय कारखाना बंद होणार नाही अशी ग्वाही चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी यावेळी दिली.

यावेळी कारखाना परिसरात उभारण्यात येत असलेल्या सहप्रकल्पाची पाहणी माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी केली. या सहप्रकल्पाबाबत विस्तृत माहिती चेअरमन बोत्रे पाटील यांनी यावेळी दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन शेषेराव ममाळे यांनी केले. या कार्यक्रमास निलंगा विधानसभा मतदारसंघातील शेतकर्यांसह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बंद असलेला सहकारी कारखाना, सहकारी तत्त्वावरच पुनर्जीवित होण्याचं किल्लारी हे देशातील एकमेव उदाहरण आहे - बी बी ठोंबरे

### किल्लारी सहकारी साखर कारखान्याचे मिल रोलरचे पूजन संपन्न....

## इतर कारखान्यापेक्षा अधिकचा भाव देऊ - आ अभिमन्यू पवार

यावर्षी पूर्ण क्षमतेनं आणि आणि वेळेवर कारखाना सुरू होणार आहे. मागच्या वर्षी थोडंच गाळप केला पण यावर्षीही तालुक्यातील कारखान्याइतका किंवा प्रसंगी अधिक दर ऊसाला दिला जाईल. कारखान्याला कोजनरेशन, डिस्लरी व सौरऊर्जा सारख्या प्रकल्पांची जोड देऊन कारखान्याला आणि कारखान्याच्या माध्यमातून किल्लारीला गतवैभव प्राप्त करुन देण्याचा संकल्प आहे असे मनोगत याप्रसंगी आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केले.

## एक रूपयाचीही फसवणूक होणार नाही - आ ज्ञानराज चौगुले

शेतकऱ्यांनी विश्वासाने साथ दिली यामुळे आमचे मनोधैर्य वाढले शासन दरबारी आम्ही हा कारखाना सुरू झाला पाहिजे हि भूमिका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मांडली यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांची आग्रही भूमिका राहिली आणि त्यांनी किल्लारी कारखाना सुरु करण्यासाठी उसनवारीवर कोट्यावधी रुपये उपलब्ध केले त्यामुळे किल्लारी आज पुनर्जीवित होत असून ज्या विश्वासाने किल्लारी सुरू होत आहे यामध्ये शेतकऱ्यांच्या एकही रुपयांची फसवणूक होणार नाही. शेतकऱ्यांना एफआरपी प्रमाणे व वेळीत ऊसाचे बील मिळेल त्यामुळे परिसरातील सभासद बिगर सभासदांनीही याच साखर कारखान्याला ऊस द्यावा असे आवाहन आ. ज्ञानराज चौगुले यांनी केले.



औसा -किल्लारी सहकारी साखर कारखाना किल्लारी परिसराच्या व शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडविणारा कल्पवृक्ष आहे. हा साखर कारखाना पुनर्जीवित होतोय हि अत्यंत आनंदायी बाब असून ज्याठिकाणी माती व माणसे सक्षम असतात आशाठिकाणी असे काही प्रसंग येतात त्या प्रसंगाने उद्योग बंद पडतात मात्र दुर्दैवाने महाराष्ट्रात या पंधरा वीस वर्षांमध्ये जे सहकारी साखर कारखाने अडचणीत आले ते सर्वच सहकारी साखर कारखाने एकतर खाजगी क्षेत्राला विकले गेले किंवा बंद पडले पण देशात एकमेव उदाहरण आहे कि आमदार अभिमन्यू पवार यांच्या अथक परिश्रमाने पुर्णपणे बंद पडलेला सहकारी साखर कारखाना पुनर्जीवित होऊन शेतकऱ्यांच्या मालकीचा होतोय असे प्रतिपादन नॅचरल शुगर अँड अलाईड् इंडस्ट्रीज चे चेअरमन बी बी ठोंबरे यांनी केले आहे.

बुधवार (दि.६) रोजी किल्लारी सहकारी साखर कारखान्याचे मिल रोलरचे पूजन करण्यात आले त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार ज्ञानराज चौगुले, आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत बी बी ठोंबरे यांच्या हस्ते या साखर कारखान्याचे मिल रोलरचे पूजन करण्यात आले. यावेळी कारखाना व्यवस्थापन समितीचे सदस्य एस. आर. नाईकवाडी, कार्यकारी संचालक आर. एस. बोरावके, गुंडप्पा बिराजदार, औसा भाजप तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, सुभाष पवार, सभापती शेखर सोनवणे, शिवसेना उमरगा तालुकाध्यक्ष बळीराम सुर्यवंशी, भाजप कासार सिरसी मंडळाध्यक्ष ज्ञा-नेश्वर वाकडे, काकासाहेब मोरे, बळीराम सोनवणे, प्रविण कोपरकर,युवराज बिराजदार, प्रा सुधीर पोतदार, रमेश वळके, गोविंद भोसले, बालाजी निकम, अमर कदम, नरसिंग मनाळे, रवी पवार, संदीप शिवणे चारे, माधव भिसे, श्रीराम पाटील आदीसह ऊस उत्पादक शेतकरी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी बी बी ठोंबरे पुढे म्हणाले की आपल्या हक्काच्या साखर कारखान्याला सहकार्य केले पाहिजे त्यादृष्टीने भागभांडवल व ऊस देऊन करावे शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडविणारा सर्वात मोठा स्त्रोत साखर उद्योग असून देश स्वावलंबी व आत्मनिर्भर करण्याच्या दृष्टीने २०१४ साली साखर उद्योगात ऐतिहासिक निर्णय झाला साखर कारखान्यात ऊसाच्या रसापासून इथेनॉल तयार करण्याचा निर्णय यामुळे साखर उदयोगातून इथेनॉल च्या विक्रीतून शेतकऱ्यांना पंधरा हजार कोटी रुपये मिळाले. . असे त्यांनी सांगितले.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# आंदोलकांना भडकवणे राज्याला घातक

'जालना जिल्ह्यातील एका गावात मनोज जरांगे – पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी सुरू केलेल्या उपोषणाने महाराष्ट्रात जाळपोळ होईल आणि आंदोलनाचा भडका उडेल अशी कोणालाच कल्पना नव्हती. जरांगे–पाटील यांनी यापूर्वी दोन डझन वेळा तरी उपोषणे केली आहेत. मग याच वेळी त्यांनी मराठा आरक्षणासाठी टोकाची भूमिका कोणाच्या सांगण्यावरून घेतली? आंदोलकांकडून पोलिसांवर दगडफेक का झाली? पोलिसांनी केलेल्या लाठीमारानंतर राज्यात आंदोलनाचा भडका उडाला, या मागे कोणत्या शक्ती आहेत? आंदोलनाचे निमित्त करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांना विरोधी पक्षांनी टार्गेट करायला सुरुवात कशी केली? लाठीमार व गोळीबाराचे आदेश जणू मंत्रालयातूनच आले असे संशयाचे वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न कोणी केले? मराठा आरक्षणाचा भडका उडाला आहेच तर तो तेवत ठेवण्यात विरोधी पक्षाला जास्त स्वारस्य आहे असे दिसते. मराठा आंदोलनावरून महायुतीचे सरकारला कसे कोंडीत पकडता येईल यातच विरोधी पक्षाला जास्त रस आहे.

मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यापेक्षा महायुती सरकारची कोंडी करणे यातच शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना अधिक स्वारस्य आहे. म्हणूनच महाराष्ट्रात शांतता निर्माण व्हावी यासाठी पुढाकार न घेता हे नेते फडणवीस यांनी राजीनामा द्यावा यावर अधिक जोर देत आहेत. जालन्यातील लाठीमारानंतर मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रात तसेच काही प्रमाणात उत्तर महाराष्ट्र व विदर्भातही त्याचे कमी अधिक प्रमाणात पडसाद उमटले. मराठवाड्यातील जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी गावात आंदोलकांवर झालेल्या लाठीमारानंतर विरोधी पक्षाला महायुती सरकारवर हल्ला करायला जणू हत्यारच मिळाले. विविध राजकीय पक्षांचे नेते तातडीने तिथे धावले व तेथे उपोषण करायला बसलेल्या जरांगे–पाटील यांची त्यांनी विचारपूस करतानाचे फोटोही मीडियातून झळकले. उपोषणाच्या मंचावर जाऊन अनेकांनी आपला कार्यभाग साधला. इतकी वर्षे मनोज जरांगे–पाटील ही व्यक्ती राज्याला ठाऊक नव्हती. पण मराठा आंदोलनाच्या केंद्रस्थानी आज ही व्यक्ती आहे व त्याचा वापर करून विरोधी पक्ष महायुती सरकारवर लाठीमाराचे खापर फोडतो आहे.

आंदोलकांवर झालेला लाठीमार योग्य नव्हता असे स्वत: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. फडणवीस यांच्याकडे गृहखाते असल्याने विरोधी पक्षांचा त्यांच्यावर रोख जास्त आहे. लाठीमारात जखमी झालेल्या लोकांची देवेंद्र फडणवीस यांनी क्षमा मागितली आहे. आंदोलकांवर पोलीस बळाचा वापर करायला नको होता, असे प्रांजळपणे फडणवीस यांनी कबूल केले आहे. तरीही विरोधी पक्षांतील काहींनी देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी चालवलीच आहे. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रात जाळपोळीच्या अनेक घटना घडल्या. 'रास्ता रोको', एसटी बसेस पेटवणे, गावातील दुकानांवर हल्ले करणे, गावोगावी मोर्चे काढून लाठीमाराचा निषेध करणे हे चालूच आहे. सकल मराठा समाज व मराठा क्रांती मोर्चाच्या बॅनरखाली अनेक ठिकाणी बंद पुकारले गेले. पण यात नुकसान कोणाचे होते? एसटी बसेसची किती मोडतोड झाली किंवा किती बस पेटवल्या गेल्या, यात आंदोलकांना काय समाधान मिळाले? उद्या या भागात बसेस उपलब्ध झाल्या नाहीत व लोकांना प्रवासासाठी बस मिळाली नाही तर कोण जबाबदार? सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करून आपण आपले पर्यायाने राज्याचे नुकसान करीत आहोत याचे भान सुटले आहे असे म्हणावे लागेल.

पूर्वी मराठा आरक्षणासाठी जेव्हा लाखोंच्या संख्यने मूक मोर्चे निघाले तेव्हा त्याची देशभर प्रशंसा झाली. पाच–सात लाखांचे ५८ मोर्चे महाराष्ट्रात निघाले. दहा लाखांचा मोर्चाही शांततेने पार पडला होता. कुठेही अनुचित प्रकार घडला नव्हता. मग जालना येथे आंदोलनाला हिंसक वळण कसे लागले, त्याला कोण जबाबदार आहे? ज्यांनी पूर्वी अत्यंत शिस्तीने व शांततेने लाखोंच्या संख्यने मोर्चे काढले ते हातात दगड घेऊन पोलिसांवर भिरकावतील किंवा एसटी बसेसवर पेटते बोळे फेकतील यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. मग ही जाळपोळ, पोलिसांवर दगडफेक किंवा दुकाने व वाहनांची मोडतोड करणारे हात कोणाचे आहेत याची सखोल चौकशी झाली पाहिजे. जे दोषी आहेत त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. लाठीमारानंतर विरोधी पक्षांच्या नेत्यांची जरांगे–पाटील यांना भेटायला रांग लागली होती. काहींनी लाठीमाराचे आदेश देणाऱ्यांना मराठवाडा बंद करा असेही आवाहन करून आगीत तेल ओतण्याचा प्रयत्न केला.

जरांगे–पाटील यांनीही काहीसा संयम दाखवणे गरजेचे आहे. सरकारच्या वतीने गिरीश महाजन, नितेश राणे, अर्जून खोतकर तसेच आणखी काही मंत्री त्यांना भेटले व त्यांना सरकार त्यांच्या मागणीविषयी सकारात्मक असल्याचे सांगितले. अशा वेळी आंदोलन भडकू नये म्हणून कुठे थांबायचे ते समजले पाहिजे. मराठा आरक्षणाचा अध्यादेश निघत नाही तोपर्यंत आपण उपोषण मागे घेणार नाही, अशी ताठर भूमिका त्यांच्या, समाजाच्या व महाराष्ट्राच्या हिताची नाही. देवेंद्र फडणवीस यांनी माफी मागितली म्हणजे त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली अशी बकबक करणारे ज्येष्ठ नेते स्वत:ची अप्रतिष्ठा करून घेत आहेत हे त्यांनाही समजत नाही. उद्धव ठाकरे यांनीही अडीच वर्षे मुख्यमंत्री असताना आरक्षणाबाबत ब्र सुद्धा काढला नव्हता हे महाराष्ट्रातील जनता जाणून आहे. केवळ आंदोलनात तेल ओतून सरकार कसे जास्तीत जास्त अडचणीत येईल एवढेच विरोधी पक्ष काम करीत आहे. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होत असताना आंदोलन भडकविण्याचे काम करीत आहेत ते राज्याला घातक आहे.

# कौटुंबिक समस्यांची गोपनीयता पाळणे अत्यंत महत्त्वाचे

आपल्या समाजात आपण घरोघरी मातीच्या चुली या उक्तीनुसार प्रत्येक घरात, कुटुंबात वाद – विवाद, मतभेद असल्याचे सर्रास ऐकतो आणि पाहतो. छोट्या – मोठ्या कुरबुरी घरोघरी सुरू असतात. ते नैसर्गिक असते आणि त्यातूनही सगळे एकत्र येतात, एकत्रच राहतात. छोटे भांडण तत्काळ मिटवणे, गैरसमज ताबडतोब दूर करणे, आपल्या घरातील माणसांना समजून घेऊन, त्यांच्या चुका पदरात घेऊन पुढे जाणे आणि समंजसपणे वागणे हे गुण कुटुंब टिकवायला, नातेसंबंध घट्ट करायला निश्चितच मदत करतात.

वाद, मतभेद, दुरावा, क्लेश, चिडचिड, मानसिक – भावनिक आणि आर्थिक ताणतणाव, समस्या, अडचणी, तक्रारी या जर घरातच राहिल्या आणि मिटल्या तर शंभर टक्के अशा कुटुंबाला कोणीच त्रास देऊ शकत नाही, वेगळं करू शकत नाही. आपापसातील विश्वास, प्रेम, आदर आणि एकमेकांप्रती असलेली निष्ठा, प्रामाणिकपणा कुटुंबातील लोकांना कायमस्वरूपी बांधून ठेवतो, टिकवून ठेवतो.

कुटुंबाचा खरा त्रास, खरा ऱ्हास, प्रचंड बदनामी आणि अधोगती तेव्हा सुरू होते जेव्हा घरातील भांडण उंबऱ्याबाहेर जातात, चव्हाट्यावर येतात. खूप पूर्वीपासून आपल्याला आपल्या घरातील मोठ्या वयस्कर लोकांनी हे सांगितले, शिकवले आहे.

परंतु आजकाल एकत्र कुटुंब पद्धती लयाला गेल्यामुळे, कुटुंबाच्या मान मर्यादेचं भान न राहिल्यामुळे आणि प्रचंड फॉरवर्ड तसेच उथळ विचारसरणीमुळे घरातील वाद बाहेर जायला घरातीलच काही मूर्ख सदस्य कारणीभूत होतात यात शंका नाही. आपल्याच घरातील माणसांचे विक पॉइंट्स, त्यांच्या चुका, त्यांचे चुकीचे निर्णय, त्यांचं चारित्र्य, घरातील आर्थिक समस्या, मालमत्तेचे वाद आपल्या घराशी काहीही संबंध नसणाऱ्या, घरातील कोणाचीही काळजी नसणाऱ्या, परक्या आणि त्रयस्त व्यक्तीला तिखट–मीठ लावून सांगितलं जातं आणि यामुळेच घरात फूट पडायला सुरुवात होते हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे घरोघरी आजकाल टीव्हीवरील मराठी मालिकाच सुरू असल्याचे जाणवते.



आपण समाजात राहतोय त्यामुळे कुटुंबापलीकडे देखील आपलं जग असतंच. रोज सातत्याने अनेक नवनवीन लोक आपल्या संपर्कात येतात, त्यातून जवळीक निर्माण होत राहाते, अनेकांना आपली तर आपल्याला देखील सगळ्यांची मदत, गरज लागत असते. आपल्याला कार्यालयीन कामात, घर कामात, इतर उपक्रमात अनेक जण हातभार लावत असतात. तरीही सगळेच दिसतात तितके साधे सरळ आणि विश्वासास पात्र नसतात. आपल्या घरात राहणाऱ्या सगळ्यांचं सामाजिक आयुष्य असतं. आपल्या प्रत्येकाच्या जवळची अथवा विश्वासाची, प्रेमाची मित्र–मैत्रिणी, सहकारी, शेजारी, मदतनीस अशी एखादी व्यक्ती असतेच.

कामाच्या ओघात, गप्पांच्या मूडमध्ये, प्रसंगनुरूप आपण आपली सुख–दुःख देखील अशा व्यक्तींसोबत वाटतो. आपल्या अडचणी, आपल्या कुटुंबाकडून असलेल्या अपेक्षा, आपल्या आयुष्यातले चांगले–वाईट प्रसंग, अप्रिय घटना, झालेला त्रास आपण अशा काही परक्या लोकांसमोर व्यक्त करतो की, ते त्या पात्रतेचे नसतात.

आपल्या आयुष्यातील कोणत्याही कारणास्तव आलेली व्यक्ती घरातली असणं आणि घरासारखी असणं हा फरक अनेकांना समजत नाही. भावनेच्या आहारी जाऊन आपण कळतं–नकळत आपली, आपल्या घरातील सगळ्यांची चांगली, वाईट माहिती, घरातली काही गुपितं, काही अतिशय संवेदनशील विषय अशा लोकांना सांगून टाकतो जे याचा पुरेपूर गैरफायदा आपल्या घराची नासाडी करायला करतात. आपल्याच घरातील सगळ्यांची पोची ओळखून, गुण–दोष ओळखून ते आपल्यालाच बरबाद करतात. मदत, सहकार्य करण्याच्या नावाखाली, सहानुभूती दाखविण्याच्या नावाखाली अशी कपटी वृत्तीची, मतलबी माणसे आपला पुरेपूर उपयोग करून घेतात आणि आपल्याच बद्दल समाजात बदनामी करत फिरतात. आपल्यासोबत तोंडावर गोड बोलतात, आपल्याच घरात, मनात स्वतःचं हक्काचं स्थान बनवतात आणि आपल्याशीच गद्दारी करतात, अशी अनेक उदाहरणे समुपदेशन दरम्यान सांगितली जातात.

आपलं जवळचं, हक्काचं म्हणून आपण ज्यांना डोक्यावर बसवतो, आपल्याच ताटातले खायला देतो, आपल्यामध्ये मिसळून घेतो बहुधा त्याच व्यक्ती आपल्याला धोका देतात, हा अनुभव अनेकांना आलेला असतो. तरीही हे आपल्याला कळत नसते किंवा कळूनही वळत नसते. कारण आपला आंधळा विश्वास त्या व्यक्तीवर बसलेला असतो.

अशा प्रसंगी, कुटुंबातील काही शहाण्या, अनुभवी लोकांनी आपल्याला सावध केले तरी आपण भलत्याच त्रयस्थ व्यक्तीमध्ये खूप वाहवत जातोय, याचा आपल्या कुटुंबाला पण त्रास होतोय हे आपल्या लक्षात येत नाही. आपण माणसे ओळखण्यात चुकूच शकत नाही हा फाजील आत्मविश्वास आपल्याला असतो आणि तिथेच आपण फसतो. अशावेळी आपण आपल्या घरातील, नात्यातील लोकांशी वाईटपणा घ्यायला सुद्धा मागे–पुढे पाहत नाही. रक्ताची, हक्काची नाती सुद्धा अनेकदा परक्या माणसांमुळे कायमची तुटतात. आपली स्वतःची माणसेच आपल्याला दुरावतात आणि त्या व्यक्तीचे हेतू साध्य होतात ज्याने हे जाणूनबुजून, नियोजनपूर्वक आपले आयुष्य, आपले कुटुंब संपवण्यासाठी केलेला असतो.

आपण अनेकदा आपल्या स्वतःच्या रक्ताचे नातेवाईक, आपले बहीण, भाऊ, पत्नी, आई–वडील यांच्यापेक्षा इतर मित्रांना–मैत्रिणींना ओळखीच्याना जास्त जवळच मानत असतो. प्रत्येकाला वैयक्तिक आयुष्य नक्कीच असावं. कोणीतरी हक्काचं, जवळचं आपल्याला समजावून घेणारं देखील असावं पण त्यासाठी आपलं घर, आपलाच संसार पणाला लागेल इतकेही त्या त्रयस्त व्यक्तीला आपल्या आयुष्यात महत्त्व नसावं. आपल्या घरातील निर्णय भलतंच कोणी घेतंय, आपल्या घरगुती विषयावर कोणीही मत मांडतेय, आपल्या घरगुती चर्चेत कोणी भलतंच हस्तक्षेप करतंय हे ऐका चांगल्या सुसंस्कृत सुशिक्षित कुटुंबात कोणीही खपवून घेऊ शकतं नाही आणि यामुळे जवळील नाती दुखावली जातात.

आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या आनंदात, सुखात नक्कीच सगळ्यांना सहभागी करा. आपलं कुटुंब समाधानी, समृद्ध आहे, आम्ही सगळे एक आहोत, आम्ही सगळेच आपल्या माणसांना किंमत देतोय असे चित्र समाजाला दाखवणे आवश्यक असते. आपल्याला समस्या असल्या, अडचणी असल्या तरी आपल्या घरातील लोक आपल्या पाठीमागे खंबीर उभे आहेत, आपल्याला घरच्यांचा पाठिंबा आणि मार्गदर्शन आहे हे जर आपण नको तिथे हस्तक्षेप करणाऱ्या व्यक्तींना पटवून दिले, तर ते स्वतःच्या मर्यादा ओळखतील. पण आपणच आपल्या घरातले भेदभाव, भांडण नको त्या लायकी नसलेल्या लोकांना सांगितले, तर त्याचा विपर्यास झाल्याशिवाय राहत नाही.

आपल्याकडूनच माहिती घेऊन, आपल्या कुटुंबातील लोकांची मनं कलुषित करणं, आगीत तेल ओतून, गैरसमज पसरवणं, आपल्या घरात वाद वाढीला लावण्यासाठी विविध कारस्थानं करणं अशा संधी स्वतःहून आपण कोणालाच देऊ नका. घराबाहेर आपल्याशी संबंधित व्यक्तींना आपल्या पुरतंच ठरावीक मर्यादेत ठेवा. कोणाला घरात आणायचं, आणल्यास त्याला कितपत आणि किती वेळ आपल्या घरात, आपल्या आयुष्यात जागा द्यायची, घरातील खासगी गोष्टी कितपत त्याला सांगायच्या यावर बंधन असू द्या. आपल्या घराला तडा जाणार नाही, आपल्या घरातल्या लोकांचा कोणी अपमान करू शकणार नाही, आपल्या नातेसंबंधात दुरावा येणार नाही, आपल्याला कोणी मानसिक, भावनिक आणि आर्थिक दृष्टीने फसवणार नाही याची काळजी घेणे फक्त आपल्या हातात असते.

त्यामुळेच घरातील त्रास, समस्या, तणाव, बिकट प्रश्न, आव्हान, वाद, कटकट, घरातील लोकांच्या चुका, त्यांचे स्वभाव, सवयी, वर्तवणूक, यांसारखे विषय सार्वजनिक करू नका. आपणच जर आपल्या घरातील इत्यंभुत माहिती बाहेर पसरवत असलो तर जगाला दोष देण्यात अर्थ नाही. आपणच जर सामाजिक जीवनात आपल्या घरातील माणसांचा, नात्यांचा आदर ठेवत नसलो तर परक्या लोकांकडून ही अपेक्षा करण्यात अर्थ नाही. आपल्या घराची चौकट किती आणि कशी मजबूत ठेवायची, आपल्या घराच्या उंब्र्यांबाहेरील जग आणि आतील कौटुंबिक जीवन याचा ताळमेळ ज्यांना घालता येतो आणि ते सर्वस्वी आपल्या हातात असते.

# शेततळ्यातून साधली समृद्धी..!

औसा तालुक्यातील नांदुर्गा येथे महेश रामचंद्र पाटील यांच्या मालकीची भारी स्वरूपाची एकूण आठ एकर जमीन आहे. ही जमीन सारणी या गावाच्या बाजूला नांदुर्गा शिवारामध्ये येते. सुरुवातीला त्यांच्याकडे असणाऱ्या एकूण आठ एकर क्षेत्रामध्ये संपूर्णपणे कोरडवाहू पिके घेतली जात होती. यापासून त्यांना जेमतेम उत्पन्न मिळायचे. त्यामुळे शेती मधला खर्च परवडत नव्हता. अनियमित पर्जन्यमान व पिकाला संरक्षित पाणी देण्याची व्यवस्था त्यांच्याकडे नसल्याने उत्पादनामध्ये घट येत होती. यातच त्यांना २०२२ मध्ये राज्य शासनाच्या कृषि विभागामार्फत शेततळ्याच्या योजनेची माहिती मिळाली.

नांदुर्गा हे गाव मंडळ कृषी अधिकारी किल्लारी अधिनस्त येत असल्याने मंडळ कृषि अधिकारी तथा कृषी पर्यवेक्षक आर. डी. रेवशेट्टी व गावचे कृषि सहाय्यक एम.जी. वाघमारे यांनी शेततळ्याची योजना महेश पाटील यांना समजावून सांगितले. तसेच या योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन करून त्यांच्या शेताची पाहणी केली. पीक परिस्थिती बदलून उत्पादनामध्ये वाढ कशा पद्धतीने करता येते, तसेच पिकाचे शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन करून पाणी व्यवस्थापनाच्या माध्यमातून संपूर्ण शेती बागायती खाली कशी आणता येईल, याबद्दल त्यांना माहिती दिली. त्यांच्या एकूण क्षेत्रांमध्ये पूर्वी वर्षाकाठी दोन ते सव्वादोन लाख रुपयेपर्यंत उत्पन्न मिळत होते.



नांदुर्गा हे गाव नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प म्हणजे पोखरामध्ये असल्याने श्री. पाटील यांच्या कागदपत्रांची संपूर्ण छाननी करून त्यांना शेततळ्याचा लाभ मंजूर करण्यात आला. त्यांना अस्तरीकरणासह २५ बाय ३० मीटरचे शेततळे दिले गेले. यासाठी त्यांना सुमारे १ लाख १२ हजार रुपये अनुदान देण्यात आले. त्यांनी शेततळ्याच्या भोवताली कुंपण करून अस्तरीकरण केले व त्यामध्ये त्यांनी पाणी भरून घेतल. चार एकर क्षेत्रावर त्यांनी कोथिंबीर सुरुवातीला घेतली व या कोथिंबीरीचे त्यांना साधारणपणे ४० ते ४५ दिवसांमध्ये सव्वा दोन लाख रुपये मिळाले. त्यानंतर सोयाबीन, हरभरा इत्यादी पिके त्यांनी स्प्रिंकलरच्या माध्यमातून शेततळ्यामध्ये असणाऱ्या पाण्याद्वारे जगविली त्यातूनही त्यांना वर्षाकाठी साधारणतः चार लाखाच्या आसपास उत्पन्न मिळाले. काही प्रमाणात उसाचेही त्यांनी उत्पादन घेतले.

शेततळ्यामुळे त्यांच्या शेतीला संरक्षित सिंचनाची सुविधा निर्माण झाली. मुबलक पाणी उपलब्ध असताना श्री. पाटील हे संपूर्ण शेततळे भरून घेतात व संपूर्ण हंगामामध्ये बारमाही पिके जगवतात. सध्या त्यांच्या शेतात पेरूची लागवड करण्यात आली आहे. चार एकर क्षेत्रामध्ये अतिघन पद्धतीने ही लागवड केलेली आहे. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचा लाभ त्यांनी घेतला आहे. त्यांना यावर्षीपासून एकूण साडेतीन लाख रुपये अनुदान दिले जाणार आहे. तसेच चार एकर क्षेत्राच्या पेरू मधून साधारणतः वर्षाकाठी सहा ते सात लाख रुपये उत्पन्न त्यांना अपेक्षित आहे. या संपूर्ण बागेला त्यांनी ठिबक सिंचनाद्वारे सिंचनाची सुविधा केली आहे.

शेततळ्यामुळे संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्याने महेश रामचंद्र पाटील यांना आर्थिक दृष्ट्या समृद्ध होण्याचा मार्ग गवसला आहेच, पण सोबत शेतीमध्ये विविध प्रयोग करण्यासाठी आधार मिळाल्याचे त्यांच्याशी बोलताना जाणवते.

– जिल्हा माहिती कार्यालय, लातूर

# भारतीय कृषक समाजाच्या राज्य उपाध्यक्षपदी जयपाल पाटील यांची नियुक्ती

अलिबाग:-- रायगडातील प्रगतिशील शेतकरी,आपत्ती व्यवस्थापन तज्ञ, ज्येष्ठ पत्रकार, रायगड भूषण प्रा. जयपाल पाटील यांची भारतीय कृषक. समाज संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती केल्याचे पत्र. राज्याचे अध्यक्ष डॉ. प्रा. सुभाष नलांगे यांनी दिले आहे.
सामाजिक कार्याची बांधिलकी जपणारे. प्रगतिशील शेतकरी जयपाल पाटील हे आंबा, भाजीपाला,नारळ उत्पादक असून त्यांना रायगड जिल्हा परिषदेने सन १जुलै २०१७ ला कृषीनिष्ठ पुरस्काराने व २०१९ ला आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्याबाबत रायगड भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.महाराष्ट्र शासनाने सन २००६ च्या१६ व्या जागतिक कृषी प्रदर्शन इस्त्रायल अभ्यास दौऱ्यास निवड केली होती.शेती विषयक अनुभव व अभ्यासा मुळे त्यांना मुंबई




आकाशवाणी कृषी कार्यक्रम समिती सदस्य म्हणून घेण्यात आले. ते आपले शेतीविषयक ज्ञान शेतकऱ्यांचे मेळावे महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश मध्ये जाऊन. पाणी वाचवा. अधिक उत्पन्न घ्यावे या विषयावर मार्गदर्शन करतात नुकताच त्यांची छत्रपती शिवाजी महाराज लोक विद्यापीठ अमरावतीच्या संचालक विस्तार पदी निवड झाली आहे. त्याचबरोबर देशभरातील लाखो नागरिकांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे. ५०९ व्याख्याना द्वारे दिले असून आकाशवाणी मुंबई-शेतकऱ्यांची सुरक्षा,रत्नागिरी-युवक युवतींची सुरक्षा,कोल्हापूर-ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा, सोलापूर- कामगारांची सुरक्षा, पुणे येथून महिलांची सुरक्षा या विषयांवर भाषणे दिली असून ४थी जागतिक आपत्ती परिषद आय.आय.टी. मुंबई येथे २ चाकी मोटरसायकल अपघात, ६वी जागतिक आपत्ती परिषद नवी दिल्ली येथे आरोग्यासाठी,शेतीकडे वळातर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पुणे शाखेने देश पातळीवरील आपत्ती परिषद, जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटी दिल्ली येथे वनांना आगीपासून वाचवा शोधनिबंध सादर केला होता. डिसेंबर मध्ये होणाऱ्या डेहराडून उत्तरांचल सहाव्या जागतिक आपत्ती परिषदे आयोजन समितीचा समन्वयक म्हणून जबाबदारी आहे.
रायगड जिल्ह्यातील ८०४ ग्रामपंचायतीतआपत्ती व सुरक्षा विषयक कार्य सुरू असुन हज-ारो शेतकऱ्यांसोबत भेट होत असल्याने भारतीय कृषक समाजाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी निर्णय घेऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी,सिंधुदुर्ग जिल्ह्याची जबाबदारी दिली असून संघटनेचे राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती केली असल्याचे. राज्य अध्यक्ष.डॉक्टर प्राध्यापक,सुभाष नलांगे यांचे पत्र संघटनेच्या महाराष्ट्र प्रभारी. सौ ज्योती सुरसे यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

# अदानी विरोधात वंचितचा धडक मोर्चा.

मुंबई /शहामत शेख :- वंचित बहुजन आघाडी यांचा वतीने वीज दरवाढ व प्रीपेड मीटर आणि मनमानी कारभारा विरोधात सुजात आंबेडकर यांच्या प्रमुख नेतृत्वात अदानी कार्यालयावर दि.०५ सप्टेंबर रोजी धडक मोर्चा काढण्यात आला. वंचितच्या कार्यकर्त्यांनी मुंबई उपनगरात घरोघरी भेट देऊन सर्वे करून लोकांच्या तक्रारी घेतल्या. हा अहवाल वरिष्ठाकडे दिला.बिलाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेचे कशी लूट चालवली आहे. हा अदानी इलेक्ट्रिसिटी पाढा सुजात आंबेडकर यांनी जनतेसमोर वाचला. पुढे म्हणाले गेली दोन वर्षे लॉकडाऊन होता,लोकांना रोजगार नव्हता चेंबूर येथील सिद्धार्थ कॉलनी मध्ये व मुंबई उपनगर मध्ये बिल न भरल्याने पाच हजार घरांची विजेचे कनेक्शन आदानी तर्फे कापण्यात आले. पाचहजार ते दहा हजार बिले पाठवून अदानी इलेक्ट्रिसिटीने सर्वसामान्य जनतेची लूट चालवली आहे हे सर्व सामान्यांना न परवडनारी बिले आहे.तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पब्लिक सेक्टरवर भर दिला होता परंतु या सेक्टरचे खाजगी करून मोदी दारुड्यासारख्या देश विकायला निघाला आहे असे एडवोकेट प्रकाश आंबेडकर आपल्या प्रत्येकदा भाषणात बोलतात,असे सुजात आंबेडकर यांनी मोर्चात उपस्थित जनतेस संबोधले.यापूर्वी बी. ई .एस .टी मुंबईत वीज सेवा पुरवत होती यांचे ट्रान्सपोर्ट व वीज पुरवठा दोन भाग होते, ट्रान्सपोर्ट म्हणजेच बेस्ट सेवा भाग हा नेहमीच




लॉस मध्ये राहिला असताना देखील व हीच बी ई एस टी वीज पुरवठा करणारी सरकारी संस्था एकीकडे फायद्यात होती, एका बाजूला तोट्यात असताना देखील मुंबईत वीज पुरवठा सुरळीत चालू होता.या संस्था प्रस्थापित सरकारने खाजगीकरण करून अदानी हातात देऊन मोठी लुटमार चालवली आहे,अशा अमानवी कृत्य करणाऱ्याच्या विरोधात हा मोर्चा आहे असे आंबेडकरांनी ठणकावून सांगितले.असाच लुटमार चालू असेल यापेक्षाही मोठा मोर्चा आम्ही सरकारवर नेऊ असे बोलून जनतेचे लक्ष वेधले. मोर्चात जमलेल्या जनसमुदायाला ५०टक्के वीज बिलात सुट मिळावी, अगर मुंबई महापालिकेत सत्तेत आलोत तर प्रत्येकाला १०० युनिट वीज मोफत देण्याचे आश्वासन सुजाता आंबेडकर यांनी दिले.यावेळी वाढीव वीज बील दराची दहीहंडी फोडून कार्यकर्त्यांनी निषेध व्यक्त केला या मोर्चात असंख्य महिला पुरुष हजर होते. वंचित बहुजन आघाडी मुंबई अध्यक्ष अब्दुल हसन खान ,युवा अध्यक्ष परमेश्वर रणसूर, मुंबई महिला अध्यक्ष सुनीता गायकवाड,उत्तर जिल्हा अध्यक्ष प्रकाश अहिरे उत्तर मुंबई महिला जिल्हा राखी बोर्डे मुंबई प्रदेश संघटक दीपक हनवते मुंबई प्रदेश उपाध्यक्ष राजा भालेकर,उत्तर मुंबई जिल्हा अध्यक्ष अजय रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उत्तर मुंबई महासचिव रफिक खान उत्तर मुबई सचिव पत्रकार शहामत शेख उत्तर मुंबई उपाध्यक्ष आरीफ पठाण, सचिव मुकेश वाकळे, दहिसर तालुका अध्यक्ष संदीप नारीया,मालाड तालुका अध्यक्ष नारायण वारकरी मागाठाणे युवा तालुका अध्यक्ष विजय लांडगे मागाठाणे तालुकाध्यक्ष मोहन खंदारे यांचे विषय सहकार्य लाभले व सर्व टीमने अथक मेहनत घेऊन मोर्चा यशस्वी केला,यावेळी मोर्चात हजारोच्या संख्येने महिला पुरुष व आदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# आपली संस्कृती नाकारणार असाल,तर मनुवाद्यांना दोष देण्यात काय अर्थ?

जगातील प्रत्येक राष्ट्रातील अल्पसंख्यिकांवर अन्याय व अत्याचार होत आला आहे. जर्मनीत वंशावरून ज्यू वर असो अथवा आफ्रिका खंडातील वर्णावरून निग्रोवर असोत, रशियामधील वर्गावरून नोकरावर असो अथवा इराक सारख्या इस्लाम राष्ट्रात पंथावरून आपल्याच धर्मातील अल्पसंख्याक शियासारखे पंथीय असोत. त्यांच्यावर बहुसंख्यांकांकडून अत्याचार झाला आहे.याला भारत देखील अपवाद नाही.आपल्या हिंदू (ब्राम्हणी) धर्मातील मागास जातीवर अन्याय अत्याचार होत राहिला आहे.बहुसंख्येने असणार्यांना अल्पसंख्यांना टार्गेट करणे फार सोपे असते.यासाठी युक्तीची नव्हे,शक्ती प्रभावी ठरत असते.'जिसकी जितनी संख्या भारी उसकी उतनी भागिदारी' हे वाक्य अल्पसंख्याकांनी नेहमी लक्षात ठेवून दुश्मनापेक्षा आपली संख्या कशी वाढेल हे पाहिले पाहिजे.अल्पसंख्याकांनी आपली संख्या कशी वाढेल हे देखील जीवन जगताना पाहिलेच पाहिजे. यालाच तर क्रांति-प्रतिक्रांती म्हटले जाते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी आपला समाज अस्पृश्य होण्यास नसलेले संघटन व कमी असलेली संख्य कारणीभूत असल्याचे जाणले. म्हणून तर त्यानी संघटित होण्याचा मूलमंत्र दिला.सहा हजार जातींना एससी,एसटी,एनटी,व्हीजेएनटी,ओबीसी,एसबीसी या सहा प्रवर्गात आणले. तरीही त्या जातीचे लोक आपापल्या प्रवर्गाच्या झेंड्याखाली एकत्र येण्यास तयार नाहीत. मी तर या सहा प्रवर्गांचा ठशीर्शीरींळेप डेलळशीू (ठड) नावाचा समुह केला. याला मराठीत आरक्षण समाज नांव दिले. कारण या सहा प्रवर्गांना संवेधानिक असलेले शैक्षणिक, राजकीय व नोकरीमधील आरक्षण मिळते. म्हणून हा आरक्षण समाज होय.जर हे सहा प्रवर्ग 'आरक्षण समाज' नावाच्या झेंड्याखाली एकत्र आले, तर चातुर्वर्ण्य व्यवस्थेमधील ब्राम्हण,क्षत्रिय,वैश्य या वर्णांना आरक्षण समाजाचे वर्चस्व मान्य करावे लागेल.पण आरक्षण समाजातील प्रत्येकाला आपली जात श्रेष्ठ वाटत आहे.माझ्या जातीपेक्षा कुठली तरी जात खालची आहे ना,हा अभिमान ओबीसी,एसबीसी प्रवर्गातील जातींच्या लोकांना वाटत असल्याने ते आपली जात सोडायला तयार नाहीत.
एनटी,व्हीजेएनटी या प्रवर्गातील अनुक्रमे भटके जाती व भटक्या विमुक्त जमातीचे लोक हे देखील आम्ही एससी प्रवर्गातील लोकांप्रमाणे अस्पृश्य नाही ना म्हणून आम्ही एससीपेक्षा श्रेष्ठ,तर एसटी प्रवर्गातील आदिवाशी समाज हा आपण या मूळनिवासी असल्याचा अविर्भाव आणत इतर सर्व प्रवर्गातील जातीपेक्षा श्रेष्ठ मानतो. त्यामुळे हे प्रवर्ग एकत्र येणेच शक्य नाही. आलेच तर ब्राम्हण,क्षत्रिय व वैश्य त्यांच्यात फूट पाडण्याचे षडयंत्र करायला कमी करणार नाहीत. कारण स्वतंत्र भारतामध्ये धार्मिक,राजकीय व आर्थिक सत्तेच्या चाव्या त्यांच्यात हातात राहिल्या आहेत. कुणीतरी १ जानेवारी १८१८ रोजी केवळ ५०० शूर नागवंशीय सैनिकांनी विषमतावादी पेशवाई संस्थानच्या २८ हजार सैनिकांचा पराभव केल्याचे उदाहरण देवून अल्पसंख्याक असले म्हणून काय झाले? असे म्हणतील किंवा साडे तीन टक्के विदेशी आर्यांचे उदाहरण देतील. विदेशी आर्य हे हिंदू धर्माचे मालक आहेत. तसा ते नेहमीच दावा करतात. आपल्या धर्मातून बहुजन बाहेर पडणार नाही याची ते नेहमीच काळजी घेत असतात. म्हणून तर रोज विष्णू, राम, शंकर असो अथवा कृष्ण, गणपती असो त्यांचे बहुजनांना वेढ लावले आहे. जगात धर्मांधवादी आपल्या धर्मियांना धर्माच्या अफूची गोळी देतात,पण हिंदू धर्मातील भूदेव आपल्या मनुवाद्यांना देव नावाच्या अफूची गोळी देत आहेत.त्यामुळे त्यानी अल्पसंख्याक असूनही त्यांना बहुजनांच्या मेंदूवर कब्जा मिळवला आहे.घरातील कुंटीला लटकवलेले हिंदू कॅलेंडर नसते तर ते ब्राम्हणी असते.प्रत्येक तारखेला काय असते हे ब्राम्हण ठरवतात,बहुजन नव्हे.तेच ते चातुर्वर्ण्यव्यवस्थेमधील शुद्र व अतिशुद्र होय.तेव्हा भिमा कोरेगांवसारख्या मोजक्या असलेल्या घटना अपवादात्मकच घडतात. अशा घटना घडल्याच तर त्या विजययाचे कारण शोधावे लागते. भिमा कोरगावच्या लढाईत ५०० शूर ज्या इंग्रजांकडून लढत होते त्या इंग्रजाकडे तत्कालिन अत्याधुनिक हत्यारे होती.
देशात कुठे ना कुठे रोज जातीय अत्याचार्याच्या घटना घडत असतातच.महाराष्ट्रात गेल्या सहा दिवसात अनेक घटना घडल्या आहेत.त्यापैकी अहमदनगर जिल्हयाच्या श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथे हिंदू धर्मातील उच्च जातीच्या लोकांनी चोरीच्या संशयावरून हिंदू धर्मातीलच आरक्षण समाजातील चौघांना झाडाला उलटे टांगून बेदम मारहाण केल्याची घटना घडली. तसेच जळगावमध्येही जातदांडग्यांकडून आरक्षण समाजातील तरूणाला बेदम मारहाण करून त्याची धिंड काढण्याचा प्रकार घडला. त्यानंतर सातारा जिल्ह्याच्या माण तालुक्यातील पानवण गावातील आरक्षण समाजातील महिलेने पशुधन चार्यासाठी दिलेल्या पैशाबाबत विचारणा केल्याच्या रागातून हिंदू धर्मातील उच्च जातीच्या लोकांनी त्या महिला व तिच्या अजान बालकाला जातीवाचक शिवीगाळ करून बेदम मारहाण केली. सांगली जिल्यातील मिरज तालुक्यातील बेडग गावातील बहुसंख्येने असलेल्या मराठा समाजातील लोकांनी गावातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वागत कमानीला विरोध केला. त्या स्वागत कमानीच्या बाजूने असणारे संख्येने कमी आहेत.विशेषतः आंबेडकरवादी.एससी प्रवर्गातील महार समाज.खरं तर महार समाजाला गावातील आरक्षण समाजातील लोकांनी साथ दिली पाहिजे होती,पण ते देखील बहुसंख्याक असलेल्या मराठा समाजापुढे बाजू घेवू शकले नाहीत. मराठा समाजातील लोकांनी भारी संख्येच्या जोरावर ग्रामसभेला स्वागत कमान ऐवजी ग्रंथालयाचा ठराव मंजूर करून घ्यावा लावला.

सांगायचे तात्पर्य इतकेच की, अल्पसंख्याकांमुळे वर्षानुवर्षे अन्याय अत्याचार सहन करण्यापेक्षा आपला समाज बहुसंख्याक कसा होईल हे पाहिले पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी बहुसंख्यांक होण्याचा बौध्द धम्मासारखा एक मार्ग दाखविलेला आहे.केवळ त्यानी मार्गच दाखविलेला नाही, तर त्यानी स्वतः बौध्द धम्म स्वीकारला आणि 'बौध्दमय भारत' करण्याची घोषणा केली. पण या मिशनसाठी बाबासाहेबांचे अनुयायी म्हणणारे कितीजण प्रामाणिकपणे कार्य करतात? ते स्वत तर बौध्द झालेत का? जे आपल्या समाजावर जातीच्या नावावर जुलूम, अन्याय, अत्याचार करतात त्यांचा धर्म सोडला का? जातदांडग्यांच्या धर्मातील सण आपल्या घरातून हद्दपार केले का? कारण धर्म व जातीच्या नावावर जुलूम करणार्यांचा आणि ज्यांच्यावर जुलूम होतो त्यांचा एक धर्म नसतो. जसे की मालक व गुलामाचा एक धर्म नसतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी 'शुद्र पुर्वी कोण होते?' या आपल्या पुस्तकात अस्पृश्य हे पुर्वीचे बौध्द असल्याचे सांगितले आहे. तेव्हा प्रथम हिंदू धर्मातील ज्या अस्पृश्य जाती मानल्या आहेत, त्या जातीच्या लोकांनी विनाअट बौध्द झाले पाहिजे. डॉ.बाबासाहेबांच्या अनुयायांनी तरी प्रथम शुध्द बौध्द झाले पाहिजे. लग्न,गृहप्रवेश, मरणोत्तर विधी बौध्द पध्दतीने केला म्हणजे कोणी स्वतःला बौध्द म्हणून घेवू नये.लोक सोंगी आणि सोयीने वागणारे आहेत.आपल्या पध्दतीने बौध्द धम्माच्या आचरणाचे परिमार्जन करताना दिसतात. अशी लोक दोन दगडावर हात ठेवणार असतात. पडद्याआडून ते किंवा त्यांच्या घरातील सदस्य हिंदू धर्माचेही आचरण करत असतात. २ मे १९५० रोजी दिल्लीत बुध्द जयंतीनिमत्त डॉ.बाबासाहेबांनी केलेल्या भाषणातून जगातील मनुष्य उत्सवाला किती महत्व देतो व बुध्द जयंती उत्सव साजरा करण्याला प्राधान्य दिल्याचे दिसून येईल. धम्म दीक्षा घेतल्यानंतर त्याना एक-दोन वर्षाचा आणखीन आयुष्य मिळाले असते, तर त्यानी धम्मातील प्रथा परंपरातील उत्सव/सण यादी जाहीर करून ते साजरे करणेस नवदीक्षांताना भाग पाडले असते. पण धम्म दीक्षा घेतल्यानंतर अवध्या ५२ व्या दिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निर्वाण झाले. त्यामुळे धम्म दीक्षा, बौध्द पध्दतीने लग्न, गृहप्रवेश, मरणोत्तर विधी, धम्म परिषद घेण्यापलिकडे काहीही घडत नाही.

आमच्यासारखे काहीजण धम्माचे सण पुढे आणत आहेत. इतकेच नव्हे,तर काही अविस्मरणीय घटनांचे रूपांतर उत्सवात केले आहे. १ जानेवारी १८१८ रोजी ५०० शूर नागवंशीय सैनिकांनी विषमतावादावर मिळवलेली विजयीघटना विजय दिनोत्सवात होवू शकत असताना किती संशोधकांना ते हेरले? दैनिक मुक्तनायकच्या माध्यमातून सर्वप्रथम आम्ही कोल्हापुरात सन २००९ च्या १ जानेवारीला भिमा कोरेगाव शौर्य विजय दिनोत्सव सार्वनिकरित्या साजरा केला. व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित केला. तर सन २०१४ पासून मी माझ्या घरातून सण म्हणून भिमा कोरेगाव शौर्य विजयोत्सव साजरा करणेस प्रारंभ केला. या उत्सवात ५०० शूरांनी ज्या हत्यारांनी २८ हजार सैनिकांचा पराभव केला त्या हत्यारांना वंदन करण्याचा म्हणजेच 'शस्त्र वंदना' चा उपक्रम घेवू लागलो. वेळप्रसंगी सरंक्षणासाठी अशा हत्यार्यांचीही गरज लागते. त्यामुळे हिंदूच्या दसर्याच्या खंडी नवमीला शस्त्र पूजन करण्यापासून अस्पृश्य म्हणजेच मूळचे बौध्द अलिप्त होतील. 'लोहे को लोहा काटता है' ही म्हण जशी वास्तावाची जाणीव करून देते, तसे आपल्या मूळ संस्कृतीशी निगडीत नसणारे सण घरातून हद्दपार करण्यासाठी सणांचाच पर्याय महत्वाचा व प्रभावी ठरतो. हेच ब्राम्हणी धर्माच्या ठेकेदारनी केले आहे. बौध्द धम्मातील सण संपविण्यासाठी बौध्द सण मंगलदिनाच्या पुढे-मागे दिवशी आपले सण सुरू केलेत. धम्म विजया दसमी उत्सवादिवशीच विदेशी आर्यांनी दसरा सण आणला. सम्राट अशोक राजा यानी इ.स.पुर्व २६१ सालच्या अश्विनी शुध्द महिन्याच्या दहाव्या दिवशी म्हणजेच दसमीला लाखो प्रजेच्यासमवेत धम्म दीक्षा घेतली. सम्राट अशोक राजानी आपल्या कूविचार, हिंसेंच्या कृतीवर बुध्दांच्या धम्माने विजय मिळवला आहे, म्हणून त्यानी आपल्या धम्म दीक्षाचा दिवस हा धम्म विजया दिन मानला. तोच दिवस धम्म विजया दसमी उत्सव म्हणून ते साजरा करू लागले. अश्विनी पौर्णिमा काळच ते अहिंसा पाळत होते. सीमोल्लंघन करत नव्हते. शस्त्र संधीचीच घोषणा करत होते. त्याच दिवशी विदेशी आर्यांनी दसरा आणून हिसेंचे समर्थन करून शस्त्र पूजन करणेस भाग पाडले. सीमोल्लंघन करायला लावले. शिवाय दहा मौर्य राजांची प्रतिकात्मक दहा तोंडांचा चेहरा दहन करण्यामागचा हेतू महाचोरांचा-वाईटांचा नयनाटचा असल्याचे सांगितले. समाजात एक म्हण आहे की 'चोरावर मोर' याचा अर्थ चारापेक्षा महाचोर. पण चोरावर मोर नव्हे तर मौर्य असे आहे. दक्षिण भारतात मौर्यला मोरे म्हटले जाते. शब्द अपभ्रंश.

शेवटाकडे इतकेच की, बौध्द धम्मातील प्रत्येक उत्सव स्वीकारले पाहिजेत. नागराजा पंचमी उत्सव माहित होता पण तो उत्सव साजरा करण्याची प्रथा यावर्षीपासून पुन्हा घराघरातून सुरू झाली हे गेल्या रविवारच्या मुक्तनायकाच्या अंकात प्रसिध्द केलेल्या उत्सव बातमीसह फोटोवरून दिसून येईलच. त्यामुळे विदेशी आर्यांची नागपंचमी उत्सव घरातून हद्दपार होण्यास मदत होणार आहे.बुध्द (रथ) उत्सव हा बौध्द धम्मातील अत्यंत महत्वाचा व ऐतिहासिक सण आहे. हा सण लोकोत्सव म्हणूनच लोकप्रिय होता. इतर धर्माचे लोक या बुध्द रथ उत्सवात सहभागी होवून साजरा करत होते. ४ थ्या शतकात बौध्द धम्माचे ग्रंथ, संस्कृती, वारसा, उत्सवाचा अभ्यास करण्यासाठी चीनमधून आलेल्या भिक्खू फा हि यान यानी स्वतः जम्बुद्विप भारतातील बौध्द देशात बुध्द उत्सव साजरा होताना पाहिला आहे. तीन महिन्यानंतर खोतान प्रांतामध्ये बुध्द उत्सव असल्याचे समजल्यानंतर फा हि यान हे पुढील प्रवास रद्द करून तीन महिने थांबले आणि तेथे सात दिवस चालणारा बुध्द रथ उत्सव पाहिला. त्यानंतर मौर्य-बौध्द संस्थानची राजधानी पाटलीपुत्र येथे १५ दिवस चालणारा बुध्द उत्सव पाहिला. तो उत्सव कशा पध्दतीने साजरा होत होता याचे वर्णन त्यानी 'बौध्द देशाचे वृत्तांत' (अ ठशलीव `ष ींहश ईीव-वहळीीं लींपीींळशी) पुस्तकात केले असून त्या पुस्तकातील संदर्भ मा.शं.मोरे यानी आपल्या 'बुध्द धम्माचे संदेशवाहक भाग-१ तीन चिनी प्रवासी' या पुस्तकात घेतला आहे.

भारतात बुध्द रथ उत्वव साजरा होत होता हे त्रिकालबाधित सत्य आहे. तो उत्सव कशा पध्दतीने साजरा केला जात होता हे मी पुढील अंकात देणार आहे. सांगितले जाते की, सम्राट अशोक राजा यानी आपल्या प्रिय महामानवाचा बुध्द रथ उत्सव सुरू केला. आज प्रत्येक गावात नजर टाकली तर प्रत्येक गावातील मुख्य देवालयातील मुर्तीची रथ यात्रा केली जाते. म्हणजेच त्याला जत्रा/यात्रा म्हटले जाते. ही जत्रा-यात्रा घरातही गोड धोड व पूजा अर्चाने साजरी केली जाते. जत्रा म्हणजे जमणे आणि यात्रा म्हणजे फिरणे. गणपतीसह गावातील जितक्याही देवी-देवतांच्या पालकी अथवा रथयात्रा काढली जाते ही बुध्द रथ उत्सवातून आदर्श घेतल्याचे स्पष्ट होते. पण गावातील देवालयातील मुर्त्या या कोणी देवी अथव देव नव्हेत तर ते वीरपुरूष, वीरमाता आहेत. त्यांची ती वारसास्थळे, स्मृतिस्थळे, प्रेरणास्थळे आहेत. त्याला आज देवालय किंवा मंदिरं म्हटली जातात. 'शितावरून भाताची परीक्षा करता येते' किंवा 'सुतावरून स्वर्ग गाठता येतो' असे म्हटले जाते त्यानुसार फा हि यान यानी जो बुध्द रथ उत्सव पाहिला त्यावरून आमचे बौध्द पुर्वज बौध्द घरात व दारात बुध्द उत्सव साजरा करत होते असा अनुमान काढता येतो. फा हि यान म्हणतात, खोतान प्रांतात वर्षाच्या चौथ्या महिन्याच्या पहिल्या दिवसापासून त्या महिन्याच्या पौर्णिमेपर्यंत दररोज बुध्द रथयात्रा उत्सव साजरा केला जात. पाटलीपुत्रमध्ये प्रत्येक वर्षी दुसर्या महिन्याच्या आठव्या दिवसापासून बुध्द रथउत्सवाला प्रारंभ होतो. म्हणजे प्रत्येक बौध्द प्रदेशात एकाच वेळी बुध्द रथ उत्सव होत नव्हता नसावा. कारण प्रत्येक ठिकाणचा बुध्द उत्सव हे सौर कालगणनातील ऋतुवर ठरवले असावेत. हा बुध्द उत्सव मी माझ्या घरातून सन २०१५ पासून कुटुंबस्तरावर साजरा करणेस सुरू करून पुनरक्रांती केली. या उत्सवाच्या माध्यमातून प्राचीन रूढी परंपरा पुन्हा रूजवली. बुध्द उत्सवरूपी रोपाने मूळ धरले आहे. गेल्या वर्षी महाराष्ट्रातील कोल्हापूर (नागभूमी) ते नागपूर पर्यंतच्या १८ जिल्हयातील घरात बुध्द उत्सव साजरा झाला. येत्या २० सप्टेंबर पासून सात दिवसीय कुटुंबस्तरीय बुध्द उत्सवाला प्रारंभ होणार आहे. २६ सप्टेंबरपर्यंत हा उत्सव कर्मकांडमुक्त व घराघरातून ब्राम्हणी धर्मातील सणामुळे पसरलेल्या अंधश्रध्दाचे निर्मुलन कसे होईल व लोक भयमुक्त कसे होतील अशी एक आदर्शपूजाची रूपरेषा तयार केली आहे. ती रूपरेषा गेल्या आठ दिवसापासून दैनिक मुक्तनायकच्या अंकात प्रसिध्द केली जात आहे. त्यासाठी दै.मुक्तनायक पहावा लागेल. बुध्द उत्सव सुरू करण्यामागचे आणखीन काही हेतू व उद्देश आहेत ती पुढील लेखात प्रसिध्द करूच पण आपली लोकसंख्या पुन्हा बहुसंख्य होण्यासाठी आपली धर्म नावाची संस्कृती स्वीकारली पाहिजे. त्यासाठी आपल्या संस्कृतीची ओळख असणारे सण घरात स्वीकारले पाहिजेत. संस्कृतीतून संस्कार निर्माण होतात आणि संस्कारातून माणूस सुसंस्कारित होतो. हे सुसंस्कार इतराना आपल्या नेतृत्व मान्य करायला भाग पाडते. अर्थात आपण कधी बहुसंख्य झालो हेच समजत नसते. अस्पृश्य, भटक्या,आदिवाशी,बलुतेदारी अशा गुलामी जातीत राहिला तर अन्याय व अत्याचार कधीच पाठ सोडणार नाही. म्हणून जातदांडग्यांना दोष देवून चालणार नाही. गुलामांचा दोष असतो असेही डॉ. बाबासाहेब म्हणाले आहेतच.
देवदास बानकर ९२२५८०६९९०,कोल्हापूर.

# तथागताच्या अष्टशिलाचे पालन हा मानवी जीवनातील सर्वोच्च आनंद -शकुंतला नेत्रगावकर



लातूर :- तथागत भगवान बुद्ध यांनी संपूर्ण विश्वाला शांतता, समता आणि मानवतेची शिकवण दिली. आपल्या धम्मामध्ये अष्टशिलाची माहिती त्यांनी आपल्या प्रवचनातून दिली आहे. मानवी जीवन सुखी, समृद्ध व निर्मळ बनवयाचे असेल तर अष्टशिलाचे पालन करणे ही मानवी जिवनातील एक सर्वोच्च आनंददायी घटना आहे असे प्रतिपादन धम्मसेविका शकुंतला अशोक नेत्रगावकर यांनी केले.

राजर्षी शाहू महाविद्यालयातील प्रा. देवदत्त सावंत यांना सत्यशोधक राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सपत्नीक सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी भाग्यश्री सावंत, अशोक नेत्रगावकर, सुधाकर कांबळे, अनुसया कांबळे, शीला वाघमारे, कदम ताई, बेबीताई कांबळे, डॉ. अरुण कांबळे, मिलिंद धावारे, कविता धावारे, सरिता बनसोडे, अनिरुद्ध बनसोडे, उदय सोनवणे आणि वसंत वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्रपणे अभिवादन करण्यात आले. याचा कार्यक्रमात अशोक नेत्रगावकर आणि शकुंतला नेत्रगावकर यांचाही सत्कार करण्यात आला.

पुढे बोलताना शकुंतला नेत्रगावकर म्हणाल्या की, बुद्धाने दिलेल्या धम्माच्या मार्गाने आपण मार्गक्रमण केल्यास आपल्या जीवनात सातत्याने आनंद निर्माण होईल. मानवी जीवन सुखदुःखाने भरलेले आहे यामध्ये दुःख अधिक आणि सुख त्यामानाने कमी आहे. मात्र केवळ आपण आपला व्यक्तिगत स्वार्थ न बघता समाजहिताकडे अधिक लक्ष दिले पाहिजे असे सांगून त्यांनी त्यांच्या जीवनातील विविध गोड आणि कटू अनुभव सर्वांना सांगितले. यावेळी अशोक नेत्रगावकर, सुधाकर कांबळे, बेबीताई कांबळे, वसंत वाघमारे, प्रा. देवदत्त सावंत, प्राचार्य डॉ. संजय गवई यांनीही मनोगते व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार ममता गवई यांनी मानले.

# क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा दौरा

लातूर, दि.६ (जिमाका): राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे ७ व ८ सप्टेंबर, २०२३ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे. क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. बनसोडे यांचे ७ सप्टेंबर रोजी सकाळी साडेसहा वाजता लातूरमध्ये आगमन होईल व 'शकुंतला' निवासस्थान येथे राखीव. सकाळी अकरा वाजता लातूर येथून उदगीरकडे प्रयाण करतील. दुपारी साडेबारा वाजता त्यांचे उदगीर येथील ओम गार्डन अँड फंक्शन हॉल येथे आगमन होईल. याठिकाणी सिद्धेश्वर गुणवंतराव पाटील यांच्या मुलीच्या साखरपुडा कार्यक्रमास ते उपस्थित राहतील. त्यानंतर उदगीर शासकीय विश्रामगृह येथे राखीव. सायंकाळी साडेपाच वाजता उदगीर येथील हनुमान मंदिर येथे श्री क्षेत्र चंद्रमोळी लिंगेश्वर जागृत महादेव मंदिर श्रावण मासनिमित्त कार्यक्रमास ते उपस्थित राहतील व सोयीनुसार उदगीर येथून लातूरकडे प्रयाण करतील. ना. बनसोडे हे ८ सप्टेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजता लातूर येथील कातपूर रोडवरील पार्वती मंगल कार्यालयात डॉ. रमन रेड्डी यांच्या मुलीच्या साखरपुडा कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी एक वाजता लातूर येथून मोटारीने उदगीर तालुक्यातील दावणगावकडे प्रयाण करतील. दुपारी सव्वादोन वाजता दावणगाव येथील संत सावता माळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये श्री संत सावता माळी मूर्ती प्राणप्रतिष्ठा व विठ्ठल रुक्मिणी प्राणप्रतिष्ठाच्या महाप्रसाद कार्यक्रमास ते उपस्थित राहतील.

# मराठा आरक्षणासाठी नवी मुंबईत एक दिवसीय लाक्षणिक उपोषण



नवी मुंबई / के. एच. हनवते :-जालना जिल्ह्यात मनोज जरांगे - पाटील यांच्या आंदोलनात अमानुष लाठीचार्ज विरोधात नवी मुंबई मराठा समाजाच्या वतीने एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. मराठा समाजाला आरक्षण मिळावे तसेच आंदोलनातील सर्व गुन्हे मागे घ्यावे तसेच .. मनोज जरांगे - पाटील यांच्या आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सकाळी ठीक ११ वाजल्यापासून एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले यां उपोषणाला बाळासाहेब शिंदे विकास पाटील, अरुण पवार, तुषार मराठे, मनोज देसाई, लक्ष्मण पाटील आदिनी उपोषणात सहभाग घेतला.

# अनाथांची नाथ समाजसेविका शारदा लोंढे राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित



सांगली : गोरगरीब, निराधार,अनाथ मुलांची आणि वृद्धमायबाप यांची निस्वार्थपणे निष्ठेने सेवा करणाऱ्या समाजसेविका तथा अनाथांच्या नाथ शारदा लोंढे यांच्या जनसेवाकार्याची दखल घेऊन, बागणी गावचे सुपुत्र सामाजिक कार्यकर्ते उमेश पाटील उर्फ नाना यांचा वाढदिवस आणि राज्यस्तरीय कृतज्ञता गौरव समारंभ आयोजित, आविष्कार फाउंडेशन, कोल्हापूर यांचे वतीने, बागणी ता. वाळवा येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार २०२३ देऊन गौरविण्यात आले. या अत्युच्च मानाच्या अलौकिक अश्या पुरस्काराने कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुऱ्हाडे पाटील यांचे शुभ हस्ते, वाढदिवस सत्कारमूर्ती उमेशनाना पाटील, आविष्कार फाउंडेशनचे संस्थापक, अध्यक्ष संजय पवार (पत्रकार,) सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक वैभव शिंदे, प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधीक्षक मनीषा कदम आणि बागणी ग्रामपंचायतच्या सरपंच तृप्ती हवालदार यांचे प्रमुख उपस्थित मानपत्र, प्रमाणपत्र आणि पुस्तकं देऊन सन्मानित करण्यात आले. समाजसेविका शारदा लोंढे या बराच काळ स्वतः कोल्हापूर येथील एका अनाथ आश्रममध्ये वास्तव्यास होत्या. तिथल्या गोरगरीब, निराधार, अनाथ मुलांमुलींची दुःखे पाहून, त्या नेहमीच अस्वस्थ होत. अनाथांचे कैवारी जेष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे ( दादा ) यांच्या आश्रयाखाली राहून, त्यांच्या प्रेरणेने त्यांनी स्वतःला समाजसेवाकार्यात सतत झोकून दिले आहे. प्रसिद्धी माध्यमापासून नेहमीच अलिप्त राहून त्यांनी समाजसेवेला जास्त प्राधान्य दिलं आहे. मिरज जि. सांगली येथे दिपगंगा भागीरथी बहुद्देशीय सेवाभावी संस्था, महाराष्ट्र राज्य संचलित... शारदा वृद्धसेवाश्रम या नांवाने निराधार, बेघर आश्रित वृद्ध मायबाप यांची त्या मनोभावे सेवा सुश्रुषा करत आहेत. सांभाळ करत आहेत. त्यांच्या या निस्वार्थ समाजसेवा कार्याची दखल घेऊन आज अखेर त्यांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील कित्येक पुरस्कार मिळाले आहेत. दिपगंगा भागीरथी संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष तथा महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक, समाजसेवक मा. हिंदरत्न दिपक लोंढे यांच्या त्या सुविद्य पत्नी आहेत. तसेच राष्ट्रीय खेळाडू आर्यदिप लोंढे आणि लेखक, दिग्दर्शक, अभिनेता श्रीआर्य लोंढे यांच्या त्या मातोश्री होत. मा. शारदा लोंढे यांना आविष्कार फाउंडेशनकडून राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार २०२३ मिळाल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांच्यावर अभिनंदन आणि कौतुकांचा वर्षाव होत आहे.

# राष्ट्रपती द्रौपदी जी मूर्मु यांची घेतली कु.सृष्टी जगताप यांनी भेट.



लातूर :- सलग १२७ तास नृत्य करून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये लातूरसह देशाचे नाव नोंदवणारी लातूरची कन्या कु.सृष्टी जगताप यांनी लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्री.सुधाकर जी शृंगारे यांच्यासमवेत देशाच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी जी मूर्मू यांची भेट घेतली.

दिनांक २९ मे, २०२३ ते ३ जून, २०२३ या कालावधी मध्ये दयानंद सभागृह लातूर येथे सलग १२७ तास नृत्य करून कु. सृष्टी जगताप यांनी जागतिक विक्रम केला असून त्यांच्याया विक्रमाचे नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये झालेली आहे. या भेटीच्या प्रसंगी देशाच्या महामहीम राष्ट्रपतींनी सृष्टीचे अभिनंदन करून तिला तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच हा विक्रम सर्व भारतीयांसाठी अभिमानास्पद असल्याची भावनाही देशाच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी जी मुर्मू यांनी व्यक्त केली. तसेच कु.सृष्टी ही आमच्या लातूरचे भूषण असून तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी आणि इतर कलागुणांना वाव देण्यासाठी आम्ही सर्व लातूरकर तिच्या सदैव सोबत असल्याची भावनाही लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्री. सुधाकर जी शृंगारे यांनी व्यक्त केली. अत्यंत सामान्य कुटुंबातून संघर्ष करत गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नाव नोंदवण्याचा विक्रम करणे ही बाब आजच्या तरुण पिढीला प्रेरणादायी असून सृष्टीच्या या यशामध्ये तिच्या एवढेच तिच्या आई-वडिलांचेही मौलिक असे योगदान आणि मार्गदर्शन असल्याचेही खासदार सुधाकर शृंगारे यांनी म्हटले.

# बेस्ट स्पर्धेत, देवाची माणसं एकांकिकेला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद



मुंबई / प्रतिनिधी :- बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ एकांकिका विभाग आयोजित स्वर्गीय विनोद पराडकर स्मृती आंतर आगार एकांकिका स्पर्धा, दिनांक ०१ आणि ०२ सप्टेंबर २०२३ रोजी, रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी येथे उत्साहात संपन्न झाली. सुप्रसिद्ध नाट्य समीक्षक श्री. संजय कुलकर्णी आणि ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती आशा ज्ञाते यांनी परीक्षण करून निकाल जाहीर केला, शुक्रवार दिनांक ०१/०९/२०२३, रोजी, लेखक-दिग्दर्शक सुनिल मोहिते यांची देवाची माणसं हि समाजातील अनिष्ट रूढी वर घणाघाती करणारी नाट्यएकांकिका, कलाकार - संजय गायकवाड, सुधाकर महाजन, मधुसूदन धेंडे, सविता देशमुख, बाजीराव मगरे, रमेश मुल्की, ममता सिंग, प्रतिक्षा शेलार, प्रिती शेलार, तनया जाधव, पुजा मोटे, प्रतिम कांदळगांवकर, मंगेश कांबळे, राजरत्न भोसले, प्रिशा बांदकर, संभाजी माने, संगिता पुरव, अमित संसारे, सुरेश गुप्ता, विजय चव्हाण, प्रशांत सावंत, राजेंद्र सोनावणे व मंडळीनी बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या, आंतर आगार एकांकिका स्पर्धा रविंद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मधे, मिटर्स विभाग-वडाळा आगाराच्या वतीने विविध विभागांच्या एकांकिका समवेत सादरीकरण करण्यात आले. त्यास प्रेक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित राहून, उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. पारितोषिक वितरण समारंभात, (सर्वोत्कृष्ट स्त्री कलाकार : प्रथम क्रमांक : सविता देशमुख

(सर्वोत्कृष्ट पार्श्वसंगीत: प्रथम क्रमांक: सुनील खोबरेकर), (सर्वोत्कृष्ट उत्तेजनार्थ अभिनय : बाजीराव मगरे), देवाची मानसं या एकांकिकेला, बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या सभापती (कला) - डॉ. राजेंद्र पाटसुते, सभापती (क्रिडा) धनंजय पवार, सरचिटणीस विजय सुर्यवंशी, उपसरचिटणीस संध्या पुरव, जेष्ठ अभिनेत्री माधुरी शेट्टी, जितेंद्र पराडकर, मानद सचिव अरूण माने, सहित उपस्थित विविध मान्यवरांच्या हस्ते देवाची माणसं एकांकिकेच्या व इतर विजेत्यांना पारितोषिकांनी सन्मानित करण्यात आले.

# विलास सहकारी साखर कारखाना ली.च्या नवीन मील रोलरचे चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते पूजन

लातूर /प्रतिनिधी :- विलास सहकारी साखर कारखाना युनिट वैशालीनगर, निवळी येथील कारखान्याच्या अंतर्गत आधुनिकीकरण करण्यात येत आहे. या अंतर्गत बसविण्यात आलेल्या नवीन मील रोलरचे विधीवत पुजन कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते सर्व संचालकांच्या उपस्थितीत करण्यात आले. विलास सहकारी साखर कारखाना लि.ची येणाऱ्या गळीत हंगामाची जय्यत तयारी सुरू आहे. या अनुषंगाने कारखान्यात नवीन बसविण्यात आलेल्या मील रोलरचे पुजन बुधवार, दि. ६ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता कारखाना साईट वैशालीनगर, निवळी येथे कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते सर्व संचालकाच्या उपस्थिती करण्यात आले. यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे, कार्यकारी संचालक संजीव देसाई संचालक सर्वश्री गोविंद बोराडे, अनंत बारबोले, भैरवनाथ सवासे, गुरूनाथ गवळी, बाळासाहेब बिडवे, नारायण पाटील, रंजीत पाटील, गोविंद डुरे, अमृत जाधव, रामदास राऊत, सुभाष माने, भारत आदमाने, ज्ञानोबा पडिले आदी उपस्थित होते. विलास कारखाना येथे आधुनीकीकरण गाळप क्षमतेत वाढ व साखरेच्या गुणवत्तेत सुधारणा होणार वसंतदादा शुगर इन्स्टीटयुट, पुणेचे तंत्रज्ञ यांनी विलास सहकारी साखर कारखाना, वैशालीनगर निवळी येथे प्रत्यक्ष भेट देवुन मशिनरीची पाहणी केली. गळीत हंगामामध्ये या मशिनरीमुळे होत असलेले स्टॉपेजेस, तसेच गाळप हंगामात मशिनरी बंद पडणे इत्यादीचा विचार करून इंजिनिअरींग व उत्पादन विभागातील मशिनरीमध्ये काही तांत्रिक बदल करणे, नवीन मशिनरी बसविणे व काही मशिनरीमध्ये बदल करणे आवश्यक असल्याबाबत कळविले होते. त्याअनुषंगाने इंजिनिअरींग व उत्पादन विभागाचे आलेल्या अहवालाचा विचार करून मील विभाग, बॉयलर हाऊस, शुगर ग्रेडर मध्ये आधुनिकीकरण करण्यात येत आहे. यामुळे तांत्रिक कार्यक्षमतेत व साखरेच्या गुणवत्तेत सुधारणा होणेसाठी तसेच वसंतदादा शुगर इन्स्टीटयुट, पुणे यांचे सुचनेप्रमाणे कारखाना मशिनरीमध्ये बदल करून आधुनिकीकरण करण्याचे काम सुरू आहे. मशिनरी आधुनिकीकरणामुळे कारखाना मॅटेन्स खर्चात बचत होऊन, कारखाना कार्यक्षमतेने चालणार आहे. कारखाना आधुनीकीकरणाचे काम अंतीम टप्प्यात असून या तांत्रिक बदलामुळे गाळप क्षमतेत वाढ व साखरेच्या गुणवत्तेत सुधारणा होणार आहे. पर्यायाने यामुळे ऊसाचे वेळेवर गाळप आणि ऊसदर सुध्दा चांगला देणे शक्य होणार आहे.



विलास सहकारी साखर उदयोग सर्वांगीण ग्रामविकासाचा पथदर्शी प्रकल्प

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली विलास सहकारी साखर कारखाना यशस्वी वाटचाल करीत आहे. विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी साखर ारखाना परिवारातील हा साखर कारखाना आहे. या कारखान्याचे युनीट नं. २ तोंडार ता.उदगीर येथे आहे. आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांची प्रेरणा, माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांचे मार्गदर्शन व संस्थापक चेअरमन माजी मंत्री,आमदार अमित विलासराव देशमुख साहेब, लातूर ग्रामिणचे आमदार धिरज विलासराव देशमुख, चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांचे नेतृत्वाखाली विलास सहकारी साखर कारखाना प्रारंभीपासून यशस्वी वाटचाल करीत आहे.

विलास कारखाना सहकार क्षेत्राचा सन्मान

कोणताही एकटा ऊसउत्पादक शेतकरी किवा काही ऊसउत्पादक शेतकरी एकत्र येऊन साखर उदयोग ऊभारणी करू शकत नाहीत. पण कतृत्ववान नेतृत्व लाभल्यास शेतकरी साखर उदयोगाचा व्यवस्थापक होऊ शकतो यांचे उदाहरण म्हणजे विलास सहकारी साखर कारखाना होय. हा कारखाना ऊभारणी पासूनच यशस्वीपणे वाटचाल करीत आहेत. येणाऱ्या गळीत हंगाम २३-२४ साठीची अंतर्गत तांत्रीक व साफसफाईची कामे वेळेवर केली गेली आहेत, ही सर्व कामे अंतीम टप्प्यात आली आहेत. यापूढील हंगामात जास्तीत जास्त ऊसाचे वेळेवर गाळप करता यावे यासाठी नवीन मील रोलर बसविण्यात आले आहे, अशी माहिती कार्यकारी संचालक संजीव देसाई यांनी दिली. तर कार्यक्षेत्रातील ऊसाचे वेळेवर गाळप करण्यासाठी कारखाना पूर्ण क्षमतेने चालवून ऊस गाळपाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ऊसातोडणी व वाहतूक यंत्रणाची उभारणी करण्यात आली आहे, असे कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे यांनी सांगीतले. कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी याप्रसंगी कारखाना अंतर्गत सुरू असलेल्या कामाची व कारखाना उभारणी केलेल्या नवीन मील रोलर कामाची पाहणी करून माहीत घेतली. तसेच सर्व संचालकांच्या उपस्थितीत खाते प्रमुख, विभाग प्रमुख व अधिकारी यांची आढावा बैठक घेतली. कारखान्यात नवीन बसविण्यात आलेल्या मील रोलरचे पुजन कार्यक्रमास विविध संस्थाचे पदाधिकारी, कारखान्याचे ऊसउत्पादक शेतकरी, अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थीत होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE